# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


माहितीचा अधिकार

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०५/२०२०/३४७ दिनांक-१२.१०.२०२०

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक :२६.०८.२०२०
जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक:०३.०९.२०२०
प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक :२९.०९.२०२०
प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक :१२.१०.२०२०

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०५/२०१९**

**अपीलकर्ता:** श्री. सेबस्टीयन झेवियर अल्मेडा

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक २६.०८.२०२० रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी यांनी दिनांक ०३.०९.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक २९.०९.२०२० रोजी वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक ०५.१०.२०२० रोजी नोटिस पाठवून दिनांक १२.१०.२०२० रोजी सुनावणी आयोजीत करून सुनावणी घेतली. देशामध्ये 'कोविड-१९' या महामारीमुळे सुनावणीसाठी अपिलार्थी व माहिती अधिकारी यांना सोईचे व्हावे म्हणून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ऑनलाईन सुनावणी म्हणून 'मायक्रोसॉफ्ट टिम्स ॲप' द्वारे किंवा 'कॉन्फरन्स कॉल' द्वारे सुनावणी घेण्याचे


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

दूरध्वनी द्वारे पर्याय दिलेले होते. त्यानुषंगाने 'कॉन्फरन्स कॉल' द्वारे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी आपले मौखिक निवेदन सादर केले.

**३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -**

**मागितलेली माहिती:-**

१) महाराष्ट्र राज्यात वीज वितरण करणाऱ्या कंपनीची माहिती मिळणे बाबत.
२) सदरची माहिती उपलब्ध असल्याच्या तारखेपासून ते आपण मला माहिती देण्याच्या तारखेपर्यंत.
३) उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र राज्य वीज वितरण करणाऱ्या किती कंपन्या आहेत, त्या कंपनीची (नाव, पत्ता त्या कंपनीचे युनिट दर) सविस्तर माहिती देण्यात यावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

युनिट दर बाबत रकाना क्र. (४) मध्ये नमूद केलेले आदेश पहावेत. सरद आदेश आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहे.

As per the Hon'ble CIC decision No. CIC/YA/A/2014/000379/SB Dated 19.09.2016 in the matter of Shri. K. Lall Vs M. K. Bagri, Assistant Registrar of Companies and CPIO, Appeal No. CIC/AT/A/2007/00112, dated 12.04.2007, since the same is available in public domain, the PIO is not obliged to provide the same to the appellant under the RTI Act.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

१) जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकाराला आजतागायत माहिती दिलेली नसल्यामुळे सामान्य प्रशासन, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क. 'केंमाअ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८' अन्वये त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई होणेकरीता सदर विभागाचे विभागप्रमुख म्हणून आपल्याकडून आवश्यक ती कार्यवाही व्हावी.
२) अर्जातील विचारलेल्या माहितीच्या तपशिलाप्रमाणे सत्य, योग्य व परिपुर्ण माहिती ३० दिवसात न दिल्यामुळे ती माहिती कलम ७ (६) अन्वये नि:शुल्क देणेबाबत आदेशीत व्हावेत.
३) अपिलकाराने अर्जात नमूद केल्याप्रमाणे सदर माहिती अपिलकाराला सही-शिक्यानिशी सत्यप्रत करून देणेबाबत जनमाहिती अधिकारी यांना आदेशित व्हावे.
४) सदर प्रकरणातील संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी केलेल्या कसुरीमुळे व हलगर्जीपणामुळे अपिलकाराल झालेल्या नुकसानी तसेच अन्य हानीबद्दल अधिनियमातील कलम १९ (८) (ब) अन्वये रु.५०००/- ची नुकसान भरपाई अपिलकाराला मिळणेकरीता आवश्यक ती कार्यवाही व्हावी.

<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-</u>

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अधिकाराच्या अर्जात मागीतलेली माहिती हि जनमाहिती अधिकारी यांनी पुरवीलेली असुन पुरविलेली माहितीतील रकाना क्रमांक-४ अपिलार्थी यांना अनाकलनीय झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाबाबत सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी पुरवीलेल्या माहितीचे सविस्तर वर्णन करुन सांगितल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांच्या उत्तरामधील रकाना क्रमांक -४ हे आयोगाने वेळोवेळी पारीत केलेल्या बहुवार्षिक वीज दर आदेशा संदर्भात असून त्या-त्या वीज वितरण कंपनीचे वीज दर हे पारित केलेल्या आदेशामधील एका विशिष्ट पान क्रमांकावर आहेत हे अपिलार्थी यांना समजलेले आहे. अपिलार्थी यांना पुरविलेल्या माहितीचे पुर्णपणे आकलन झालेले असुन ते या माहितीने समाधानी आहेत. करीता अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी

प्रति,
श्री. सेबस्टीयन झेवियर अल्मेडा,
डी/५, शहा कॉलनी,
जस्मीन सुपर मार्केटच्या मागे,
कांजुरमार्ग (पू), मुंबई - ४०००४२.
मो.नं.९३२३२१७५६५

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी